## ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापिठाच्या एम्. फिल. शिक्षणशास्त्र या पदवीच्या पुर्ततेसाठी संशोधन कार्य पार पाडताना संशोधकाला श्रीमती पुतळाबेन शाह कॉलेज ऑफ एज्युकेशन, सांगलीचे प्राचार्य वा.र.कुलकर्णी व सर्व प्राध्यापक वर्ग यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले, या सर्वांचा संशोधक ऋणी आहे. या संशोधन कार्यात संशोधनपध्दती व अहवाल लेखन-शास्त्र संदर्भातील सखोल मार्गदर्शन डॉ.अरविंद ना.जोशी, प्रपाठक यांच्याकडून मिळाले. शैक्षणिक प्रशासनातील अंतदृष्टी असलेले डॉ.सु.कृ.वाघ यांच्या सखोल व नियमित मार्गदर्शनामुळेच या संशोधनास अखेरचा टप्पा गाठणे शक्य झाले. संशोधकाचे सहकारी मुख्याध्यापक केन्द्रप्रमुख, तालुकामास्तर, शिक्षणविस्तार अधिकारी यांचा या कार्यास हातभार लागला. त्यांच्या सहकार्याबद्दल अभ्यासक त्यांचा ऋणी आहे.

संशोधन समस्येच्या संदर्भात माहिती उपलब्ध होण्यास जिल्हा परिषद शिक्षण विभाग, सांगली, पंचायत समिती, कवठेमहांकाळ, पंचायत समिती, वाळवा शिक्षण विभागातून तसेच एस.पी.एस.कॉलेज ऑफ एज्युकेशनचे ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ मुख्य ग्रंथालय, पुणे विद्यापीठ जयकर ग्रंथालय, प्रौढ व निरंतर शिक्षण विभाग, पुणे विद्यापीठाचे संचालक डॉ.श्रावण के.केजरीवाला यांचा मोलाचा हातभार लागला. या सर्व कार्यालय प्रमुखांचे व त्यांच्या सहका-यांचा संशोधक ऋणी आहे.

संशोधकाने संशोधन समस्येच्या संदर्भात माहिती मिळविण्यासाठी शिक्षणक्षेत्राशी संबंधीत अनेक संस्थांशी भेटी दिल्या व संबंधीतांच्याकडून माहिती मिळवली. शिक्षक, मुख्याध्यापक, केन्द्रप्रमुख, तालुकामास्तर, शिक्षणविस्तार अधिकारी, प्राध्यापक, प्राचार्य, गटशिक्षणाधिकारी, अधिक्षक, उपशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी, शिक्षणप्रेमी व्यक्ती, सभापती, सरपंच, शिक्षणतज्ज्ञ, यांच्याकडून माहिती, मुलाखती, प्रश्नावली, निरीक्षणे, पडताळे

अशा स्वरूपात घेतली. सर्वांनी आपल्या मौल्यवान प्रतिक्रिया दिल्या. या सर्वच प्रतिसादकांचा ऋणनिर्देश करणे संशोधक आपले कर्तव्य समजतो. या संशोधन अहवालाचे टंकलेखन अत्यंत कमी वेळेत करून देण्याची जबाबदारी सौ. हसबडे यांनी पेलली त्यांचे व अनावधानाने राहिलेल्या संबंधीत व्यक्ती व संस्थांचा संशोधक ऋणी आहे.

स्थळ : सांगली

दिनांक :

श्री. गणपत द. भोसले,
संशोधक